**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ३१ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **माओवादाविरुद्ध लढा दिलेल्या सी-60 जवानांना राज्य शासनामार्फत विशेष 'सी-60 पदक' देण्यात येणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा.**
2. **'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाला उद्यापासून राज्यात प्रारंभ.**
3. **जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीचा आज सर्वत्र उत्साह.**

**आणि**

4. **उद्या यवतमाळ जिल्ह्यात गारपीटीची शक्यता, आज विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात वादळी पर्जन्यमान.**

**आता सविस्तर बातम्या .......**

अमित शहा/ मुख्यमंत्री सी-60

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने नक्षलवादाविरुद्ध निर्णायक लढा देऊन, नक्षलग्रस्त भागात विकास पोहोचवला, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते काल लोकसभेत या विषयावर निवेदन करत होते. गेल्या दशकात देशात नक्षलवादी हिंसाचारात लक्षणीय घट झाली असून, अनेक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केल्याचं त्यांनी सांगितलं. २०२४ पासून छत्तीसगडमध्ये दोन हजारांहून अधिक नक्षलवाद्यांनी मुख्य प्रवाहात प्रवेश केला, २०२५ मध्ये ३०० हून अधिक नक्षलवादी मारले गेले आणि ८०० हून अधिक जणांना अटक करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. जे शस्त्र खाली ठेवतील त्यांच्याशीच चर्चा केली जाईल, पण गोळीबार करणाऱ्यांना गोळ्यांनी प्रत्युत्तर दिलं जाईल, असंही शहा यांनी यावेळी सांगितलं.

***(होल्ड बाईट - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह 32 सेकंद)***

दरम्यान नक्षलवादाविरोधातल्या लढ्यात महाराष्ट्र पोलिसांनी निर्णायक यश मिळवलं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईत पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद काल झाली,त्यावेळी ते बोलत होते. माओवादी कारवाया आताराज्यात नगण्य पातळीवर आल्या असल्याचं त्यांनी सांगितलं. यामुळे, किमान तीन वर्षे सी-60 मध्ये

सेवाबजावणाऱ्या जवानांना राज्य शासन विशेष सी-60 पदक; देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. गडचिरोलीसारख्या भागात आता विकासाचे नवे चित्र उभे राहत असून लोकशाहीची मुळे बळकट होत असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माओवादाची चळवळ राज्यात नगण्य पातळीवर आली असून आता तिच्या पुनरुज्जीवनाला आळा घालणे हे पुढील मोठे आव्हान आहे. या संघर्षात 244 पोलीस कर्मचारी शहीद झाले, तर 609 नागरिकांनी प्राण गमावले आहे.

जनगणनेची प्रक्रिया

जनगणनेची प्रक्रिया उद्यापासून सुरू होणार असून, नागरिकांना स्व-नोंदणी पोर्टलद्वारे दोन्ही टप्प्यांत माहिती देण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. देशातली ही १६वी जनगणना असून पहिल्या टप्प्यात प्रत्येक घराची माहिती गोळा केली जाईल. त्यात घराचा क्रमांक, मजला, घराची स्थिती आणि घरात राहणाऱ्या व्यक्तींची संख्या अशा माहितीचा समावेश असेल. या प्रक्रियेत कुटुंबप्रमुखाचे नाव, लिंग, जात, मालकी हक्क, तसंच घरातील विवाहित जोडप्यांची संख्या आणि वाहनांची माहितीही नोंदवली जाणार आहे. जर एखादं जोडपं लिव्ह-इन संबंधाला कायमस्वरूपी आणि विश्वासार्ह नातं मानत असेल, तर त्यांची गणना विवाहित जोडप्यामध्ये केली जाईल असं या पोर्टलमध्ये म्हटलं आहे. पोर्टलवर वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी उपलब्ध आहे, त्यामुळे जनतेला विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरं देणं सोपं जाईल.

‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणाऱ्या या राज्यव्यापी अभियानाला १ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे. हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वारे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा राज्य शासनाचा मानस आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न केले जाणार आहे. या प्रस्तावित योजनेमुळे गावापासून ते राज्यस्तरावरील आरोग्य सेवांचे

आणि यंत्रणांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत.

पंचायती राज

पंचायती राज संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी १५व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार अनुदानाला मंजुरी देऊन केंद्र सरकारनं निधी वितरित केला आहे. महाराष्ट्राला पंचायती राज संस्थांसाठी अनुदानातल्या पहिल्या आणि दुसऱ्या हप्त्यांमधून प्रत्येकी १०९ कोटी रुपये वितरित झाले आहेत. हा निधी २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाराष्ट्रासह तेलंगणा, राजस्थान, उत्तराखंड आणि मिझोराम या राज्यांना मिळणार आहे. या अनुदानामुळे गावपातळीवर प्रशासन अधिक सक्षम होईल आणि गरजेनुसार विकासकामं राबवता येतील. तेलंगणाला १२ हजार ६०० ग्रामपंचायतींसाठी पहिल्या हप्त्यात तब्बल २४७ कोटी रुपये देण्यात आले आहेत. उत्तराखंडला दुसऱ्या हप्त्यात ९१ कोटी रुपये मिळाले असून, याचा लाभ १३ जिल्हा परिषद, ९५ ब्लॉक परिषद आणि जवळपास ८ हजार ग्रामपंचायतींना होणार आहे. मेघालयलाही २०२१-२२ या आर्थिक वर्षात दुसऱ्या हप्त्यात २७ कोटी रुपये मिळाले आहेत. ठराविक उद्दिष्टांसाठी मर्यादित निधी आणि स्थानिक गरजेनुसार वापरता येणारा निधी असे दोन प्रकारचा हा निधी आहे.

भगवान महावीर जयंती

जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती आज सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे.गावागावात आज जैन मंदिरांमधे धार्मिक प्रवचन आणि इतर कार्यक्रम होत आहेत. तसंच शोभायात्रांचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महावीर जयंती निमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी ही महावीरजयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.भगवान महावीरांची शिकवण मानवतेला शांती,सलोखा आणि करुणेच्या दिशेने मार्गदर्शन करत असल्याचं राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. भगवान महावीर यांचा सत्य, अहिंसा आणि जागतिक शांततेचा संदेश मानवतेला मार्गदर्शक आहे असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. सत्य आणि अहिंसेचा मार्ग दाखवत जगाला प्रेमाची शिकवण देणाऱ्या भगवान महावीर यांना जयंतीनिमित्त कोटी कोटी वंदन करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जैन बांधवांना हार्दीक शुभेच्छा असं आपल्या संदेशात म्हटलं आहे. मुंबईत दादर इथं

भारत जैन महामंडळातर्फे आयोजित महावीर जन्मकल्याणक महोत्सवात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहभागी झाले होते.

हवामान

संपूर्ण विदर्भात उद्या वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय यवतमाळ जिल्ह्यात गारपीट होण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. यासाठी यवतमाळ जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून यादरम्यान मेघगर्जना सोसाट्याचा वारा आणि पाऊस पडण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी आज अमरावती, अकोला, वर्धा, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये हवामान सामान्य असून नागपूरसह भंडारा, चंद्रपूर, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा इथं वादळी पर्जन्यमान राहणार आहे. वर्धा जिल्ह्यात आज सर्वाधिक 41.6°c इतक्या सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद करण्यात आली तर अमरावती आणि अकोला जिल्हा देखील तापमान 41 अंश सेल्सिअसच्या घरात आहे. नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम या जिल्ह्यांमध्ये तापमान 40°c या घरात असून बुलढाणा आणि यवतमाळ जिल्ह्यात 39 अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आलं आहे.

अवकाळी पाऊस

राज्यात काल रात्रीपासून विविध जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली. भंडारा जिल्ह्यात रात्री अवकाळी पावसाने वादळी वाऱ्यासह हजेरी लावली यात आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला गेला आहे. आता शेतकरी या नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी करत आहेत. अकोला जिल्ह्यामध्ये विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह काही भागांमध्ये गारपीट नोंदवली गेली.अकोट तालुक्यातल्या कावसा इथं शेतात वीज कोसळून आठ मेंढ्या दगावल्या. तालुक्यात या पावसामुळे गहू, कांदा, लिंबू, आंबा, पपई, आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी कापणीसाठी ठेवलेले धान्य भिजून खराब झाले, तर फळबागांमध्ये पडझड झाली. यवतमाळ जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांच्या रब्बी, भाजीपाला आणि फळपिकांचे मोठे नुकसान झालं आहे.

आयपीएल

IPLक्रिकेटमध्ये,पंजाब किंग्ज विरुद्ध गुजरात टायटन्स हा सामना आज चंडीगडमधे होणार आहे.काल गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं चेन्नई सुपर किंग्सचा आठ गडी राखून पराभव केला. चेन्नई सुपरकिंग्सनं विजयासाठी ठेवलेलं १२८ धावांचं लक्ष्य१३ व्या षटकांतच पार

केलं.राजस्थान रॉयल्सकडून वैभव सूर्यवंशीने १७ चेंडूंत ५२ धावांची वेगवान खेळी केली. राजस्थान रॉयल्सचा नँद्रे बर्गर 'सामनावीर' ठरला.

हनुमान जन्मोत्सव

नागपुरातील ऐतिहासिक राजाबाक्षा हनुमान मंदिरातून निघणाऱ्या ३० व्या हनुमान जन्मोत्सव शोभायात्रेची तयारी अंतिम टप्प्यात असून यंदा ती अधिक भव्य करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या शोभायात्रेत ७० ते ८० आकर्षक झांक्या सहभागी होणार असून "हनुमान चालीसा पाठ झांकी" हे विशेष आकर्षण ठरणार आहे. १ एप्रिलपासून अखंड हनुमान चालीसा पाठ सुरू होणार असून २ एप्रिल रोजी सायं. ५.३० वाजता देवेंद्र फडणवीस व नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत महाआरतीनंतर शोभायात्रेला प्रारंभ होईल. शहरातील प्रमुख मार्गांवरून ही शोभायात्रा पार पडणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

*****